# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक :

१.१ कादंबरी म्हणजे काय

१.२ कादंबरीचे घटक

१) कथानक २) व्यक्तिरेखा ३) वातावरण निर्मिती ४) निवेदन

५) भाषाशैली

१.३ दलित कादंबरीचे स्वरुप आणि विकास

१.४ दलित कादंबरीची पूर्वपीठिका

१.५ दलित कादंबरीच्या अभावाची कारणमीमांसा

समारोप

# प्रकरण पहिले
# मराठी कादंबरी एक वाटचाल

# प्रकरण पहिले

# मराठी कादंबरी : एक वाटचाल

## प्रास्ताविक :

कादंबरी हा वाङ्मय प्रकार मराठीत आंग्ल संपर्कातूनच आपल्याकडे आला आहे. इंग्रजीमध्ये कादंबरीला 'नावल' किंवा 'नॉवेल' असे म्हणतात. या नामाभिधानावरून मराठीमध्ये कांदबरी हा वाङ्मयप्रकार रूढ झाला आहे. वास्तविक पाहता आंग्ल संपर्कानेच आपल्याला कादंबरीचे भान आले असे खात्रीने म्हणावे लागते. कारण सुरवातीच्या काळात आपण फक्त इंग्रजी कादंबऱ्यांचे स्वैर अनुवाद व भाषांतरच करीत आलो आहोत. खरे तर अगदी १२ व्या, १३ व्या शतकापासून मराठीत लीळाचरित्रासारखे अव्वल दर्जाचे गद्य मराठी भाषेत लिहिले गेले होते. ज्याच्याकडे कादंबरी म्हणून पाहणे नक्कीच शक्य झाले असते. तरीही प्रस्तुत वाङ्मय प्रकार इंग्रजीच्या आगमनानंतरच मराठी साहित्यात विकसित झालेला दिसून येतो. या वाङ्मय प्रकाराचा घाट मोठा असून कथानक, उपकथानक, व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती, इ. घटकांनी विकसित झालेला हा वाङ्मय प्रकार आहे, असे असले तरी "एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला कादंबरी हे नाव मराठीमध्ये बऱ्याच आधीपासून रूढ असावे"[१], असे कुसुमावती देशपांडे जो तर्क काढतात तो योग्यच वाटतो.

## १.१ कांदबरी म्हणजे काय ?

आधुनिक कालखंडात कादंबरी हा सर्वाधिक लोकप्रिय आणि वाचला जाणारा वाङ्मय प्रकार आहे. वास्तविक पाहता कोणत्याच ललित साहित्यकृतीची व्याख्या करता येत नाही. खरे तर समीक्षक किंवा वाङ्मयाचे जाणकार त्या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये किंवा लक्षणे सांगत असतात. प्रस्तुत ठिकाणी लेखक, समीक्षक, जाणकारांनी कादंबरीच्या अनेक व्याख्या केलेल्या आहेत. भालचंद्र नेमाडे यांच्या मते, "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्राचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत सरंचना मांडणारी अनेक पात्रे, प्रसंग, अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली अशी साहित्यकृती असते."[२]

'साहित्यसाधना' या समीक्षा ग्रंथात प्रा. माधव काशिनाथ देशपांडे यांनी कांदबरीची व्याख्या केलेली आहे. ती अशी - "जीवनाचे कलात्मक व विस्तृत गद्य चित्र म्हणजे कादंबरी."[३]

'मराठी कादंबरी पहिले शतक' (१८५०-१९५०) या कादंबरीवरील समीक्षा ग्रंथामध्ये कुसुमावती देशपांडे म्हणतात की, "एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला कादंबरी हे नाव बऱ्याच आधीपासून रूढ असावे".[४] यावरून असे लक्षात येते की, कादंबरीमध्ये कल्पना विस्ताराला विशेष महत्त्व आहे.

उषा हस्तक यांनी 'कादंबरी आणि मराठी कांदबरी' या समीक्षा ग्रंथात कादंबरीची

लक्षणे म्हणजेच कादंबरीची व्याख्या असे म्हटले आहे. त्या म्हणतात, "कादंबरी हे कथात्मक गद्याचे भरपूर लांबी असलेले रूप आहे, तिला किमान लांबी तर हवीच त्याशिवाय तिचे कादंबरी म्हणून अस्तित्व जाणवणार नाही. तिच्या लांबीची किमान आणि कमाल मर्यादा सूचित करण्यासाठी शब्द संख्येचा आधार घेण्यात आलेला आहे. हे लक्षण म्हणजे कादंबरीचे वैशिष्ट्य ठरते."[५]

श्री. का.बा. मराठे यांनी इंग्रजीतील 'नॉव्हेल' या शब्दावरून मराठीतील या वाङ्मयप्रकाराला 'नावल' असे म्हटले आहे. त्यांच्या मते "नावल म्हणजे चमत्कारिक गोष्ट ज्यात आश्चर्यकारक गोष्टी फार व जो वाचला असता अव्वलपासून अखेरपावेतो वाचणारास जागोजागी नवल वाटावे, अशा प्रकारचा जो ग्रंथ त्यास इंग्रजीत 'नावल' अशी संज्ञा आहे. नावल म्हणजे 'नवल समूह' अशा अर्थसाम्यावरून मराठीतील सदरहू ग्रंथाचे तेच नाव राखिले असता चिंता नाहीं."[६]

कादंबरी या साहित्यप्रकाराबद्दल मराठी समीक्षकांनी वरीलप्रमाणे विविध व्याख्या केलेल्या आहेत. या व्याख्या म्हणजेच कादंबरीची लक्षणे किंवा वैशिष्ट्ये आहेत हे लक्षात घ्यावे लागते. पाश्चात्य विचारवंतांनी कादंबरीच्या वेगवेगळ्या व्याख्या केलेल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे.

"The term Novel is now applied to a great variety of writings that house in common only the attribute of being extended works of prose

Fiction. As an extended narrative, the novel is distinguished form the short story and form the work of middle length called the "Novelette" its magnitude permits a greater variety of characters, greater complications of plot (or Plots) an ampler development of milieu, and a more sustained and subtle explorations of character than do the shorter, necessarily more concentrated modes"[7] Shroder Maurice, 'The Novel as a Genra', an essay included in the theory of Novel[8]

"A lenghty fictious prose narrative portaying characters and presenting an organised series of events and setting A work of Fiction with Fewer than 30,000 to 40,000 words is usually considered a short story, novelette or tale, but the novel has no actual maximum length. Every novel is an account of life; every novel involves conflict characters, action settings, plot and theme"[9]

कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा विचार करताना पाश्चात्य विचारवंत समीक्षक आणि भारतीय विचारवंत समीक्षक यांच्या व्याख्यांचा सुवर्णमध्य काढला असता विस्तृत जीवनपट मांडणारा साहित्यप्रकार म्हणजे कादंबरी होय, असे अभ्यासाअंती लक्षात येते.

## १.२ कादंबरीचे घटक -

कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा अभ्यास करताना व कादंबरीचे रचनातंत्र समजून घेताना तिला साकार करणाऱ्या घटकांचा परामर्श घेणे येथे विशेष महत्त्वाचे आहे. ते घटक पुढीलप्रमाणे -

### १. कथानक -

कादंबरीत एखादे महत्त्वाचे कथानक नेहमीच असते, याचा अर्थ असा की, कादंबरीमध्ये ज्या असंख्य घटना आणि प्रसंग घडून येतात त्यातूनच एक बांधेसूद असे चित्र उभे राहते. प्रत्येक कादंबरीत कादंबरीकाराला काही तरी सांगायचे असते, त्याचे बीज अगोदरच त्याच्या मनात पडते. कादंबरीच्या विषयाचे बीज अशा रीतीने लेखकाच्या मनातून स्फुरल्यानंतर त्याला हळूहळू कादंबरीचे कथानक आकारू लागते. वाचकाचे चित्त व कुतूहल सतत जागृत राहील अशी कथानकाची रचना असते. थोडक्यात असे सांगता येईल की, कार्यकारणभावाची संगती निर्माण करण्याचा प्रयत्न झाला म्हणजे तेथे कथानक निर्माण होते.

### २. व्यक्तिरेखा -

कादंबरीच्या कथानकाला जेवढे महत्त्व आहे तेवढेच महत्त्व कादंबरीतील व्यक्तिरेखा या घटकाला आहे मानवी जीवन हा कादंबरीचा विषय असला तरी मानव हे फार मोठे गूढ आहे आणि कादंबरीतील चित्रविचित्र व्यक्ती मानवी जीवनाच्या

अभूतपूर्व आणि अभिनव आंगोपांगाची जाणीव वाचकांच्या मनामध्ये निर्माण करतात. या व्यक्तिरेखा वास्तवावर आधारलेल्या असल्यातरी निख्खळ वास्तवातील व्यक्तींची जशीच्या तशी प्रतिबिबे नसतात, तर लेखकाच्या प्रतिभा सामर्थ्याने अधिक आकर्षक, कलात्मक आणि अधिक परिणामकारक बनलेली लेखकाची ती मानसचित्रे असतात. कादंबरीकाराच्या व्यापक सूक्ष्म निरीक्षणातून या व्यक्तिरेखा आपणासमोर जिवतपणे साकार होतात आणि आपण त्यांच्या भावविश्वाशी समरस होतो म्हणून हा कादंबरीचा घटक येथे विशेष महत्त्वाचा ठरतो.

## ३. वातावरण निर्मिती -

प्रत्येक कादंबरीची किंवा कादंबरीकाराची प्रकृती भिन्न असते. त्याचे कारण काही विशिष्ट वातावरणाची पार्श्वभूमी प्रत्येक कादंबरीला लाभलेली असते. वातावरणनिर्मिती शिवाय कादंबरीला जिवंतपणा येत नाही, म्हणून वातावरण निर्मिती हा कादंबरीचा लक्षणीय विशेष मानण्यात येतो. कादंबरीतील व्यक्ती कोणत्याही पोकळीत जगत नाहीत त्यांची मुळे कादंबरीमध्ये कादंबरीकाराच्या कल्पनाशक्तीने निर्माण केलेल्या वातावरणात रूजलेली असतात. कादंबरीतील व्यक्तींच्या अंतःर्बाह्य वर्तनाला चालना देण्याचे फार मोठे सामर्थ्य वातावरणामध्ये असते, म्हणूनच कादंबरीच्या रचनातंत्राचा एक महत्त्वाचा घटक म्हणून वातावरणाकडे पाहता येते.

## ४. निवेदन -

कोणतीही कादंबरी भाषिक निवेदनाच्या मदतीशिवाय वाचनीय रूप धारण करू शकत नाही. आपली कादंबरी वाचकांना शब्दबद्ध रूपात वाचता यावी, एवढ्याच मर्यादित रचनेत कादंबरीच्या भाषिकनिवेदनाला अतिशय महत्त्व आहे. कारण कादंबरीचा समग्रपट वाचकांसमोर उलगडण्यासाठी निवेदनाशिवाय दुसरा पर्याय नाही. कादंबरीद्वारा अभिव्यक्त होणाऱ्या अनुभवाची सगळी परिमाणे निवेदनातूनच सूचित होतात. या निवेदनतंत्राचा पायरी-पायरीने किंवा क्रमाक्रमाने लेखक वापर करतो. कादंबरीला साकार करणाऱ्या सर्व घटकांचा तपशील पुरविण्यासाठी आणि विशिष्ट दृष्टिकोणातून त्यांची मांडणी करण्यासाठी कादंबरीकाराजवळ निवेदन हे एक साधन उपलब्ध असते आणि या साधनाचा वापर कादंबरीकाराने अतिशय सावधपणे करणे आवश्यक आहे.

## ५. भाषाशैली -

कादंबरीतील पात्रे ही लेखकाच्या हातची खेळणी होऊ नये, म्हणून त्यांना स्वतःच्या भाषेत बोलता आले पाहिजे. एकूण व्यक्तिमत्त्वानुसार पात्रांची भाषा असणे गरजेचे आहे, कादंबरीकाराच्या मनोवृत्तीतून त्याची लेखनशैली निर्माण होत असते. भाषाशैलीमुळेच कादंबरी लेखनात परिणामकारकता येते. लेखकाच्या लेखनशैलीला भाषेमुळेच संस्कृतिनिष्ठ, इष्ट आणि समाजहिताच्या जाणिवेची वैशिष्ट्ये प्राप्त होतात,

भाषेमुळे साहित्यकृतीचे सौंदर्य वाढविले जाते, पण कधी-कधी काव्यात्मकता, नाटयात्मकता, अलंकारिकता आस्वादकता, भावविवशता आणि भडकपणा यांचा अतिरेक भाषाशैलीच्या दृष्टीने कादंबरीला मारक ठरतो.

## १. दलित कादंबरीचे स्वरूप आणि विकास

आंग्ल राजवटीच्या आगमनानंतर इ.स.१९२५ पासून मराठी साहित्यात दलित जीवनाचे चित्रण मध्यमवर्गीय लेखकांच्या कलाकृतींतून चित्रित होऊ लागलेले दिसते. श्री. कृ. कोल्हटकरांची 'श्यामसुंदर' ही १९२५ मधील कादंबरी दलित जीवनातील अस्पृश्यता निवारण्याबाबतच्या विषयाला सामोरी जाते. यातील सवर्ण नायक श्याम हा शूद्र-अतिशूद्र वस्तीत राहून त्यांच्या उद्धाराचे प्रयत्न करतो. १९३६ मध्ये रामतनय यांच्या 'खरा उद्धार' या कादंबरीनेही दलित जीवनातील अस्पृश्यता निवारण हा आपल्या कादंबरीचा विषय केलेला आहे. १९२० ते १९५० या कालखंडात मध्यमवर्गीय लेखकांनी दलित जीवनातील अस्पृश्यता, अस्पृश्यता निवारण, सहभोजन, मंदिर प्रश्न, पाणी भरण्याचा प्रश्न इ. दलितांच्या प्रश्नांवर कादंबरीलेखन केलेले आढळते. श्री हडपांची 'पारिजातकाची फुलं', प्रा. ना. सी फडके यांची 'प्रतिज्ञा', श्री चिंदरकर यांची 'महापूर', शांताबाई नाशिककरांची 'कीर्ती', गीता साने यांची 'धुके आणि दहिवर', श्री. ग.त्र्यं. माडखोलकरांची 'चंदनवाडी', विभावरी शिरूरकरांची 'बळी' इ. कादंबऱ्यांचा या दृष्टीने उल्लेख करता येईल. दलित जीवन रेखाटणाऱ्या

या कादंबऱ्या असल्यातरी त्या निव्वळ दलित जीवनचित्रणाला वाहिलेल्या कादंबऱ्या नसून तत्कालीन अनेक सामाजिक प्रश्नांचा त्यामध्ये ऊहापोह करण्यात आलेला आहे. मध्यमवर्गीय लेखकांनी आपल्या साहित्यामधून दलित जीवनाचे केलेले चित्रण हे गांधीवादाच्या प्रेरणेतून केल्याचे स्पष्ट जाणवते. या साहित्यावर गांधीवादाचा स्पष्ट प्रभाव जाणवतो. गांधीजींनी " Untouchability is a Crime against God and Man." "अस्पृश्यता हा हिंदूधर्मावरील कलंक आहे. तो नष्ट केला पाहिजे.", असे १९२०-२१ च्या सुमारास अस्पृश्यता-निवारण चळवळी संदर्भात म्हटले होते व यातून प्रेरणा घेऊन वरील पांढरपेशा मध्यमवर्गीय मराठी साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून अस्पृश्यतेचा प्रश्न सहानुभूती, दया, करुणा या भावनेतून हाताळला होता. परंतू मध्यमवर्गीयांच्या जाणिवेतून हाताळलेला दलितांचा प्रश्न हा काहीसा हस्तिदंती मनोऱ्यामध्ये(Ivory Tower) बसून मांडलेला दिसतो. म्हणून या मराठी साहित्यिकांच्या साहित्यातील दलित जीवनचित्रणाविषयी शंकरराव खरात म्हणतात, "म. गांधीजींच्या या ग्रामोद्धार व अस्पृश्यता निवारण या चळवळींचा त्या कालखंडातील साहित्यिकांवर परिणाम झाला होता. म. गांधीजींची अस्पृश्यता निवारण चळवळ त्यांच्यापुढे 'आदर्श' म्हणून होती (त्याच सुमारास महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळही चालू होती) या म. गांधीजींच्या अस्पृश्यता निवारणावर कथा-कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. पण यातील अस्पृश्यांचे, दलितांचे जीवन कृत्रिम व उपरे वाटते".१०

खरातांचे हे विधान मध्यमवर्गीय साहित्यिकांच्या साहित्यात आलेल्या दलित जीवनचित्रणाच्या स्वरूपावर प्रकाश टाकणारे आहे.

दलितांविषयी सहानुभूतीचे, दयेच्या, करुणेच्या भावनेने लिहिलेले साहित्य हे दलित साहित्य नव्हे. कारण दलित साहित्याच्या केल्या गेलेल्या व्याख्येसंदर्भात विचार केला असता, मध्यमवर्गीय जाणिवांच्या कक्षेतून रेखाटले गेलेले साहित्य दलित साहित्य ठरू शकत नाही म्हणून दलित साहित्याविषयीची मूळ संकल्पना विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते.

दलित साहित्यामागची मूळ प्रेरणा ही गांधीवादात नसून आंबेडकरवादात आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय जाणिवेने केलेल्या दलित जीवनचित्रणामधून दलित मनाचा प्रत्यय येत नाही. म्हणून मध्यमवर्गीयांच्या साहित्यामधून आलेले दलित जीवनाचे चित्रण हे दलित साहित्य म्हणून ओळखले जाऊ शकत नाही. या विषयी बाळकृष्ण कवठेकरांची भूमिका विचारात घेणे योग्य वाटते. ते म्हणतात, "हे लेखन दलित जीवन चितारत असले तरी ते एकीकडून स्वप्नाळू आदर्शवाद आणि दुसरीकडून वास्तवाला सवंग करणारा रंजनवाद यांनी बाधित झालेले आहे."[११] ही कवठेकरांची भूमिका पटण्यासारखी आहे.

दलित जीवनाकडे पाहण्याचा मध्यमवर्गीयांचा दृष्टिकोण हा दलित जाणीव प्रकट करणारा नसून तो स्वप्नाळू, रंजनवादी असा आहे. त्यामुळे दलित साहित्य

आणि दलित जाणीव म्हणजे काय? या प्रश्नांचे भालचंद्र फडके यांनी दिलेले उत्तर मध्यमवर्गीयांचे व दलित जीवन चित्रणाचे योग्य ते मूल्यमापन करते. भालचंद्र फडके म्हणतात, "दलित वर्गीय जीवनाचे व व्यक्तींचे चित्रण मराठी साहित्यात झाले आहे ते अतिशय केविलवाणे असून त्यात दलित जीवनाचे सत्यदर्शन घडत नाही, ही डॉ. म.ना. वानखेडे यांची तक्रार खरीच आहे. या साहित्याशी दलित लेखक समरस होणारच कसा? कारण आपण जे जगतो ते जीवन आणि मध्यमवर्गीय लेखकांच्या साहित्यातून घडणारे 'जीवनदर्शन' यांच्यातील विसंवाद त्याला जाणवतो".१२ मध्यमवर्गीयांचे दलित जीवनविषयक लेखन हे दलित लेखकास समरस करू शकत नाही. दलित लेखक आणि मध्यमवर्गीय लेखक यांच्या दलित 'जीवनदर्शना'बाबत विसंवाद दिसून येतो.

दलित जाणीव आणि दलित साहित्य यांचा मूलगामी विचार मांडला आहे तो शरदच्चंद्र मुक्तिबोध यांनी या संदर्भात त्यांचे विचार हे दलित साहित्याच्या नेमकेपणाचे दर्शन घडवितात. ते म्हणतात, "दलित वाङ्मय म्हणजे दलितोद्धाराचे वाङ्मय नव्हे. माट्यांचे वाङ्मय किंवा खांडेकरांच्या 'दोन मने' या कादंबरीचा नायकही दलितच आहे. ह्यात लेखक उच्च वर्गीय असून तो कनिष्ठ वर्गाकडे अनुकंपेच्या दृष्टीने पाहतो. हे दलित वाङ्मय नव्हे किंवा दलित लेखकांनी निर्माण केलेले वाङ्मयही दलित साहित्य नव्हे. दलित असणे आणि दलित जाणीव असणे हे भिन्न आहे. दलित

जाणिवेतून दलित जीवनविषयक जे वाङ्मय निर्माण होते ते दलित वाङ्मय.[१३]

शरदच्चंद्र मुक्तिबोध यांनी दलित लेखकाने लिहिलेल्या वाङ्मयास दलित साहित्य संबोधलेले नाही. त्यांनी 'दलित जाणिवे'ला केंद्रस्थानी ठेवून दलित साहित्याची व्याख्या केलेली आहे. दलित जाणीव आणि दलित साहित्य यांचा एकात्म संबंध आहे. हे वरील सर्व विवेचनावरून सिद्ध होते, आणि त्यामुळे मध्यमवर्गीयांच्या साहित्यामधून दलित जीवनाचे चित्रण येत असले तरी त्याला दलित साहित्य मानता येत नाही. तेव्हा गांधीवादाच्या प्रेरणेतून निर्माण झालेले साहित्य दलित जीवनचित्रण करीत असले तरी ते दलित साहित्य ठरत नाही.

दलित साहित्याच्या व्याख्येच्या संकल्पनेशी आणि दलित जाणिवेला सामावून घेणारी कादंबरी म्हणजे श्री. ना. रा. शेंडे यांनी १९३८ मध्ये लिहिलेली 'शृंगारलेले प्रेत' ही होय. गांधीवादाचा प्रभाव असलेल्या या कालखंडात मध्यमवर्गीय मराठी दलित साहित्यापेक्षा स्पष्ट दलित जाणीव विशद करणारी ही कादंबरी होय. या कादंबरीच्या दलित कादंबरीतील स्थानाबाबत शंकरराव खरात म्हणतात, "दलितांच्या जीवनावरील या कादंबऱ्या (मध्यमवर्गीयांनी दलितजीवनावर लिहिलेल्या) पाहिल्या असता दलितातील एक ज्येष्ठ साहित्यिक श्री. ना. रा. शेंडे यांची 'शृंगारलेले प्रेत' ही कादंबरी मराठी पांढरपेशा साहित्यिकांच्या कादंबरीपेक्षा अनुभवाने अस्सल वाटते. म्हणून या कादंबरीचे वेगळेपण दिसून येते".[१४]

स्वतःच्या अनुभूतीने श्री. शेंडे यांनी लिहिलेली ही कादंबरी अस्पृश्यतेला झुगारून गरिबी दूर करू पाहणाऱ्या आणि दलितोद्धारात प्राण पणाला लावणाऱ्या नायकाची कथा सांगते.

संख्यात्मक दृष्टीने पाहिल्यास दलित साहित्यात 'दलित कादंबरी' चे लेखन अल्प-प्रमाणात झालेले दिसते. ज्या विपुल प्रमाणात 'दलित कविता', 'दलित आत्मकथने', 'दलित कथा' लिहिली गेली, त्या प्रमाणात 'दलित कादंबरी' चे दालन विरळ असल्याचे आढळते. दलित कादंबरीच्या या अल्पतेबद्दल आणि दलित लेखकांनी कादंबरीक्षेत्रात कामगिरी बजावण्याबद्दल डॉ. जनार्दन वाघमारे आवाहन करतात. ते म्हणतात, "कथा, कविता आणि आत्मकथा या तीन साहित्यप्रकारांचाच प्रामुख्याने दलित लेखकांनी आतापर्यंत उपयोग केला आहे. दलित रंगभूमी उभी करण्याचा प्रयत्न होत असला, तरी लक्षवेधी नाटकांची अद्याप पुरेशी निर्मिती झालेली नाही. दलित जीवनातील विविध प्रकारच्या अनुभवांना मोठा कॅनव्हास प्राप्त करून द्यायचा असेल तर कादंबरीकडे वळणे भाग आहे. दलित साहित्याने मराठी वाचकांना अद्याप एखादा हरिभाऊ आपटे किंवा मुन्शी प्रेमचंद दिलेला नाही. दलित लेखकांनी नाटक आणि कादंबरी या दोन महत्त्वाच्या साहित्य प्रकारांकडे वळावे, अशी मराठी वाचकांची इच्छा आहे".[१५]

डॉ. वाघमारे यांनी महत्त्वाच्या कादंबरी व नाटक या वाङ्मय प्रकाराकडे

दलित लेखकांनी वळावे, असा दिलेला सल्ला दलित कादंबरीचे दलित साहित्यातील अल्पत्त्व आणि स्थान स्पष्ट करतो.

## २. दलित कादंबरीची पूर्वपीठिका -

दलित साहित्यातील दलित कादंबरीची संख्या कमी असली, तरी कादंबरीलेखनाचा हा प्रयत्न अलीकडे जास्त होताना दिसत आहे. दलित कादंबरीची सुरुवात श्री. ना.रा. शेंडे यांनी १९३८ मध्ये लिहिलेल्या 'शृंगारलेले प्रेत' या कादंबरीपासून करता येईल. तत्कालीन पांढरपेशा लेखकांच्या कलाकृतींमधून प्रकट झालेल्या दलित जीवनचित्रणापेक्षा श्री. ना.रा. शेंडे यांची 'शृंगारलेले प्रेत' ही कादंबरी अस्सल जीवनानुभव देते. आपल्या या कादंबरीच्या संदर्भात स्वतः श्री. ना. रा. शेंडे म्हणतात, "माझ्या कथा कादंबऱ्यांच्या निर्मितीला अनुभूतीपूर्ण प्रसंगाची पार्श्वभूमी आहे. १९३८ साली 'शृंगारलेले प्रेत' या शीर्षकाची पहिली कादंबरी मी निर्माण केली. अस्पृश्यतेला झुगारून गरिबी दूर करू पाहणाऱ्या आणि दलितोद्धारात प्राणपणाला लावणाऱ्या नायकांभोवती एक उत्कृष्ट सेवाभावाचे वलय मी रेखांकित केले होते".[१६]

कादंबरीतील नायकाचा दलितोद्धाराच्या मागील हेतू मध्यमवर्गीय लेखकांच्या हेतूशी साधर्म्य दाखविणारा आहे किंवा नाही हे जरी श्री. शेंडे यांच्या विधानातून स्पष्ट होत नसले तरी श्री. शेंडे यांनी या कादंबरीत अनुभूतीपूर्ण प्रसंगांचे परिणामकारक चित्रण केलेले दिसते.

श्री. ना. रा. शेंडे यांनी 'शृंगारलेले प्रेत' या कादंबरीनंतर चार कादंबऱ्या लिहिल्या. 'काजळी रात्र' (१९५६), 'तांबडा दगड' (१९५८), 'विलासिनी' (१९७४), 'अन्शुजा' (१९७४) या त्या चार कादंबऱ्या होत. 'काजळी रात्र' या कादंबरीद्वारे समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या दलित साहित्यमूल्यांना वर्धित करण्याचा मनोदय श्री. शेंडे व्यक्त करतात. या कादंबरीविषयी ते म्हणतात, "विषमता नष्ट व्हावी व समता राखली जावी, जातिभेद साफ झुगारला जाऊन दारिद्र्यात होरपळत असलेला खालचा स्तर उन्नत व्हावा आणि पर्यायाने ग्रामविकास साधला जावा या कल्पनेने मी माझ्या कादंबरीचा देह निर्माण केला आहे. ब्राह्मण, ब्राह्मणेतर आणि दलित यांच्या युतीने तिचा आत्मा घडविलेला आहे".[१७] ब्राह्मण, ब्राह्मणेतर आणि दलित यांना एकाच समतेच्या विचारपीठावर एकत्र आणण्याचा या कादंबरीतून श्री. शेंडे यांनी केलेला प्रयत्न खूपच आगळावेगळा ठरतो. म्हणून प्रस्तुत मध्यमवर्गीयांच्या दलित जीवनचित्रणावरील कादंबऱ्यांपेक्षा या कादंबरीचे वेगळेपण सांगताना शंकरराव खरात म्हणतात, "अशी ही 'काजळी रात्र' इतर मराठी साहित्यिकांच्या कांदबऱ्यांपेक्षा आशय, रूप यांनी वेगळी आहे".[१८]

'तांबडा दगड' मध्ये आदिवासींचा उद्धार आहे. या कादंबरीतील ब्रीजकन्या दुष्ट चुडामणीचा त्याच्याशी शौर्याने झुंज देऊन वध करते आणि म्हणते, "मी एका चांडाळ मनुष्याला ठार केले नाही, तर दुष्टपणाची, नीचपणाची, द्वेष मत्सराची होळी

केली.” ‘विलासिनी’ ही ध्येयवादी कादंबरी आहे. भारतीय स्त्री किती उच्च व उदात्त असू शकते, हे श्री. शेंडे यांनी या कादंबरीत दाखविले आहे. ‘अन्शुजा’ ही कादंबरी अतीन्द्रिय विश्वाच्या पर्यावरणात अव्यक्त रूपाने वास करणाऱ्या पवित्र मनोद्रव्याच्या प्रबलशक्तीची उपासना करते.

दलित कादंबरीला समृद्ध करणारे कादंबरी लेखक म्हणजे अण्णाभाऊ साठे अण्णाभाऊ साठे यांनी ‘अलगूज’, ‘आवडी’, ‘संघर्ष’, ‘चंदन’, ‘रानगंगा’, ‘वारणेच्या खोऱ्यात’, ‘माकडीचा माळ’, ‘आघात’, ‘अग्निदिव्य’, ‘मयूरा’, ‘कुरूप’,‘ रानबोका’, ‘डोळे मोडीत राधा चाले’ इ. विपुल कादंबरीलेखन करून त्यातून ग्रामीण जीवनाचे अस्सल दर्शन घडविलेले असले तरी, त्यांची ‘फकिरा’ ही कादंबरी दलित जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण करते. दलितांवर होणारे अन्याय, त्यांचा छळ, त्यांची उपासमार, त्यांच्यामधील कर्तृत्वाचे होणारे मानहानीकारक अवमूल्यन इ. चे चित्रण अत्यंत समर्थपणे ‘फकिरा’ मध्ये अण्णाभाऊ साठे करतात. दुष्काळात निष्क्रिय असलेल्या, गरीबांची उपासमार करीत असलेल्या शासनास अण्णाभाऊंचा ‘फकिरा’ अत्यंत त्वेषाने बोलतो, “ह्ये कुंभकर्णाच्या अवलादीचं राज्य हाय. आपुन तलवार घेऊनच ह्येच्या उरावर नाचलं हय”. आपल्या जमातीच्या उत्कर्षासाठी, सुखासाठी फकिरा लढता-लढता पराभूत होतो, परंतु प्रस्थापित व्यवस्थेविषयीच्या त्याच्या उसळलेल्या संतापजनक उर्मी ह्या शेवटपर्यंत अन्यायाचा प्रतिकार करतात. अण्णाभाऊंची ‘वैर’ ही ‘फकिरा’

बरोबरच लिहिलेली कादंबरी जातीजातीतील उच्चनीचता, वैरभाव नाहीसा होऊन समाजामध्ये समता प्रस्थापित व्हावी, असा आशय व्यक्त करते. एकूणच अण्णाभाऊंच्या कादंबरी लेखनासंदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, "अण्णाभाऊंच्या कादंबरीत ग्रामीण जीवनाचे चित्र असते. त्यांची माणसे लढाऊवृत्तीची असतात. गरीबांचा कैवार घेऊन लढणाऱ्या माणसांविषयी अण्णाभाऊंना अपरंपार प्रेम आहे".[१९] अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यातील पात्रांविषयी डॉ. फडके यांनी काढलेले उद्‌गार सार्थ वाटतात.

अण्णाभाऊ साठेनंतर दलित कादंबरीला समृद्ध बनविण्याचे श्रेय दिले जाते ते शंकरराव खरातांना १९५७ साली नवयुगच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या 'माणुसकीची हाक' या कादंबरीत शंकरराव खरातांनी दलित जीवनाचा व जगण्याचा अनुभव प्रभावीपणे व्यक्त केला आहे. अस्पृशांचे दलित आणि दुःखमय जीणे या कादंबरीत उभे राहिले आहे. आंबेडकरवादाची प्रखर प्रेरणा घेऊन शंकररावांनी ही कादंबरी लिहिली आहे. कादंबरीचे वेगळेपण तिच्यातील आशय आणि दलित जाणिवा यामुळे स्पष्ट होते. झोपडपट्टीचे ओंगळ दर्शन शंकरराव खरांतांनी 'हात-भट्टी' या कादंबरीत घडविले आहे. झोपडपट्टीतील नरकासमान जीवन, तेथील दादांची अरेरावी, त्यांनी केलेली छेडछाड, पोलिसांच्या धाडी, त्यांचे हप्ते, जीवघेण्या हाणामाऱ्या यांचे अत्यंत प्रभावी चित्रण 'हात-भट्टी' मध्ये येते. शंकरराव खरातांनी 'मी

मुक्त! मी मुक्त!' या कादंबरीत अनाथाश्रमात वाढलेल्या अनाथ मुलाची कथा मांडली आहे. गटारात फेकलेल्या जीवनाच्या फेऱ्यात घालवलेल्या अनोख्या, लहान अनाथ जीवांचे दर्शन ही कादंबरी घडवते.

शंकरराव खरातांनी 'गावचा टिनोपाल गुरूजी' ही कांदबरी आगळयावेगळया विषयाला वाहिलेली कादंबरी होय. या कादंबरीतील कावळे गुरूजी म्हणजे शिक्षण क्षेत्राला कलंक असलेली एक प्रवृत्ती आहे. शिक्षक असताना कावळे गुरूजींनी इतर अनेक धंदे केले आणि इस्टेटी कमावल्या. हा कावळे गुरूजी आपल्या कृत्याचे समर्थन करताना म्हणतो, "मी काय चूक केली? वरचे तेच करतात, त्यांचेच धडे आम्ही घेतले, अन् तेच धडे आम्ही मुलांना दिले. हे समतेचं युग आहे. आम्ही हे पोटासाठी केलं, का तुमच्या डोळ्यावर आलं? पण हाच प्रश्न वरच्यांना कोण विचारणार?" कावळे मास्तरच्या प्रवृत्तीच्या विरोधी विधायक प्रवृत्तीच्या सिद्धेश्वर हेडमास्तरांची व्यक्तिरेखा शंकररावांनी चितारली आहे. सिद्धेश्वर हेडमास्तर आयुष्यभर निष्ठेने काम करणारे, व्रतस्थ, निर्भय असे आदर्श आहेत.

प्रा. केशव मेश्राम यांनी मराठी कादंबरीला 'हकिकत', 'जटायू' आणि' पोखरण' अशा तीन कादंबऱ्यांची मोठी देणगी दिली. 'हकिकत' मधील नायक हा आत्मनिवेदक बनून आपल्या गतजीवनातील आठवणींना उजाळा देतो. अत्यंत खडतर बालपण आणि तितकेच खडतर तरुणपण या विषयी 'हकिकत' मधील निवेदक सांगतो, "....

मित्राच्या घरी महार ठरलेला मी. कळत नकळत बालपण गेले लोकलला लटकण्यात, ऑफिसच्या खुर्चीत पोक काढून कसरीसारखा कागद कुरतडण्यात, तारूण्याचा दहीकाला झाला". कुठेही भावनावश न होता अत्यंत संयमाने आपले आत्मकथन प्रा. मेश्रामांनी 'हकीकत' मध्ये व्यक्त केले आहे. त्यांच्या 'हकिकत' बद्दल शंकरराव खरात म्हणतात, "या लघुकादंबरीत अस्पृश्यांच्या सकस, सखोल अशा जीवन अनुभवाची एका चांगल्या कलाकृतीत अभिव्यक्ती झालेली आहे. ती आपल्या आत्मतेजाने आपले वेगळेपण दाखवते".२०

प्रा. मेश्राम यांची 'जटायू' ही प्रतिकात्म कादंबरी आहे. दुर्बलांसाठी स्वतः रक्तबंबाळ होणारा हा रामायणातील जटायू अभिमनच्या रूपाने 'जटायूत येतो. 'अभिमन' चे आईवडील पिढयानपिढया चालत आलेली अन्न मागून खाण्याची वहिवाट पाळत नव्हते. तर ते घाम गाळून काम करत. एका वेगळया संस्कारात वाढलेला 'अभिमन' नव्याने जाग्या झालेल्या समाजाच्या आकांक्षा जाणीत होता. नेने मास्तरांनी अभिमन मांगेवार सिद्धार्थ नगरातून पास झाल्याचा उल्लेख केला पण सत्कार मात्र झाला तो शेंडे आणि रामटेके यांचा. "सिद्धार्थनगराचे मी असे काय वाईट केले"? असा विचार अभिमनच्या मनात आला. अभिमनच्या मनाची उलघाल रंगविताना प्रा.मेश्राम यांनी अंधश्रद्धा, भोळसटपणा, गतानुगतिकता यांच्या जोखडातून हा समाज केव्हा आणि कसा मुक्त होणार? असा प्रश्न उपस्थित केला आहे.

दलित कादंबरीची उपरोक्त पूर्वपीठिका आपणास दलित कादंबरी लेखनाची पार्श्वभूमी उलगडून दाखविते. उपरोक्त दलित कादंबऱ्या व्यतिरिक्त श्री. मधुकर भोसेकर यांच्या 'सिद्धार्थाची यशोधारा', 'कपिलवस्तुचा राजकुमार', श्री. ज.वि.पवार यांची 'बलिदान', प्रा. सुखराम हिवराळे यांची 'मायगोदें' इ. दलित कादंबऱ्यांनी आपल्या आशयाचे वेगळेपण जोपासून दलित कादंबरीच्या दालनात भर टाकली आहे.

अलीकडच्या काळातील काही दलित लेखकांनी कादंबरीलेखनाकडे लक्ष पुरवलेले दिसते. या कादंबरी लेखनात भि. शि. शिंदे यांची 'रायनाक', सुधाकर गायकवाड यांची 'शूद्र', सुधीर पोवार यांची 'अस्मिता', माधव कसबे यांची 'नकुल', ना.ब. जाधव यांच्या 'राजाभाऊ', 'डॉ. अंजना', निशिकांत शेंडे यांची 'कलंकमुक्ती, हरिभाऊ पगारेंची 'युगप्रवर्तक', हिं. गो. बनसोडे यांची 'मुक्तिसंग्राम', 'उज्ज्वला' इ. कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल.

## ३. दलित कादंबरीच्या अभावाची कारणमीमांसा -

दलित साहित्यामध्ये साहित्यप्रकारांच्या संख्यात्मक अंगाचा विचार करता क्रमवारीत दलित कविता, दलित कथा, दलित आत्मकथने आणि दलित कादंबरी असा क्रम लागतो. कविता,कथा आणि आत्मकथने यांचे दलित साहित्यात वैपुल्य आढळते. याची कारणमीमांसा करताना बाळकृष्ण कवठेकर दलित आत्मकथनाविषयी म्हणतात, "... दलित लेखकांना आत्माभिव्यक्तीसाठी तोच (आत्मचरित्र) जवळ

जवळ एकमेव असा वाङ्मयप्रकार असल्याने दलितांनी आत्मचरित्राकडे वळावे...... दलित साहित्याचे सामर्थ्य ज्या चाकोरी बाहेरच्या अनुभव विश्वात सामावलेले आहे, ते अनुभव विश्व खऱ्या अर्थाने साकार करण्याचा दलित आत्मकथालेखन हा एक अत्यंत योग्य मार्ग आहे. केवळ दलितांनाच येऊ शकतील असे अनुभव, कुठल्याही भूमिकेचे कमीत कमी रंग चढवले जाऊन प्रकट होण्याचे दलित आत्मकथा हेच माध्यम असू शकते".[२१]

दलित आत्मकथनांच्या विपुलतेबाबतची कारणमीमांसा बाळकृष्ण कवठेकरांच्या वरील विधानात आढळते. एक तर दलित जीवन, अनुभवविश्व हे रूढ अनुभवविश्वापेक्षा अत्यंत भिन्न आहे आणि दुसरे असे की, हे अनुभवविश्व साकार करण्यासाठी आत्मकथा लेखन हा सोपा मार्ग आहे. शिवाय आत्मकथालेखन करताना कुठलाही चेहरा धारण करावा लागत नाही. या कारणांमुळे आत्मकथांचे प्राबल्य दलित साहित्यात आढळते.

दलित कविता आणि कथा यांच्या विपुलतेचीही अशीच कारणमीमांसा बाळकृष्ण कवठेकरांनी केलेली आहे. त्यांनी या वाङ्मयप्रकारांच्या विपुलतेची कारणे दलित लेखकांचे व्यापक अनुभविश्व, वैचारिक नवदृष्टी, त्यांची जीवनविषयक भूमिका, वाङ्मयीन पर्यावरण यांमध्ये शोधली आहेत. याबाबत ते म्हणतात की, "नवजागृत समाजातील नव्यानेच लेखन करणाऱ्या लेखकांना आपल्या स्वतःच्या जीवनातील

घडामोडी, सत्यकथा, अनुभव सांगावे तसे वाटणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे... कथन आणि निवेदन हे दोन अभिव्यक्तीचे तुलनेने सुलभ असे मार्ग होत".[२२]

आत्मकथा, कविता आणि कथा या वाङ्मयप्रकारातील अभिव्यक्तीची सुलभीकरणाची प्रवृत्ती हे प्रस्तुत वाङ्मयाच्या विपुलतेचे कारण त्यांनी विशद केलेले आहे.

दलित कादंबरीचा एकूण दलित साहित्यातील आवाका फार कमी आहे आणि ज्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. त्यात दलित जाणिवा आणि वाङ्मयीन जाणिवा यांचा अभाव आहे. दलित कादंबरी समृद्ध आणि सुदृढ होण्याइतपत अनुभवविश्वाचा, दलित जीवनाचा शतकाचा प्रवास कारणीभूत व्हावयास हवा होता परंतु तसे मात्र झाले नाही. याची दलित साहित्याची भूमिका आणि दलितांची सांस्कृतिक अवस्था अशी दोन कारणे बाळकृष्ण कवठेकर सांगतात. दलित साहित्याची भूमिका दलित साहित्याला लढण्याचे साधन मानते त्यामुळे या भूमिकेला उपयुक्त असे आत्मकथा, कविता आणि कथा हे वाङ्मयप्रकार दलित साहित्यिकांनी निवडलेले दिसतात. सांस्कृतिक अवस्थेबद्दल दलितांची अवस्था अत्यंत विदारक होती. पोटापाण्याच्या गरजा भागविण्यासाठी सतत संघर्षमग्न असलेल्या दलित समाजाचे गावकुसाबाहेर जीवन सर्वणांबरोबर मेळ खाऊ शकले नाही. त्यातून निर्माण झालेली पोकळी कादंबरी या वाङ्मयप्रकाराला प्रतिकूल ठरली. कादंबरी लेखनासाठी ज्या

सांस्कृतिक अभिसरणाचे संस्कार मनावर उमटावे लागतात ते दलित लेखकांच्या संदर्भात उमटलेले नसल्याने एक कप्पाबंद जीवन त्यांना जगावे लागले. त्यातूनच कादंबरी लेखनास आवश्यक असणारी व्यामिश्रता उपजली नसल्याने कादंबरी लेखनाकडे त्यांनी जास्त झेप घेतली नाही . म्हणून बाळकृष्ण कवठेकर दलित कादंबरीच्या अभावाची कारणमीमांसा करताना म्हणतात. "इतर समाज घटकाशी होणाऱ्या अभिसरणतून येणारी दृष्टिकोणाची बहुपरिणामकारक्ता, बहुपीडिंता, अनेक आकलन क्षमता अजून तरी दलित दृष्टिकोनात आलेली दिसत नाही. कादंबरीसारख्या व्यापक वाङ्मय प्रकाराच्या निर्मितीसाठी नेमक्या हयाच बहुपरिणामक्ता, बहुपीढी, अनेक कार्यवाहक, स्वयंत्तर मनसमासमवेशक अशा चिंतनात्मक दृष्टिकोणाची गरज असते.

दलित साहित्यकांमध्ये आजच्या घडीला ही दृष्टि नसल्याने कादंबरी सारख्या वाङ्मय प्रकाराची निर्मिती त्यांच्या हातून होऊ शकत नाही."२३

दलित जीवनाचा प्रवास हा अनेक शतकाचा प्रवास आहे. या प्रवासात गतकाळातला त्यांचा वर्तमानकाळ दडलेला आहे. या काळखंडाच्या पोटातील त्यांचा अनुभव त्यात दाबला आहे. प्रत्येक दलित लेखकाच्या स्वतःच्या जीवनातील उलथापालथ, दैन्य, दुरावस्था, अस्पृश्यता ही इतकी भयान आहे की, प्रत्येक दलित लेखकाचे जीवन हाही कादंबरीला पुरेसा असा समर्थ विषय होऊ शकेल, परंतु अशा या जीवनाचा आविष्कार करण्याकरता कादंबरीसारखा फॉर्म त्यांनी स्वीकारायला

हवा. अशा फॉर्म स्वीकारण्यातून त्यांच्या जीवनातील असामान्य अनुभव कादंबरीचे रूप सहजपणे घेऊ शकतात. या नव्या फॉर्मच्या आव्हानाविषयी डॉ. जनार्दन वाघमारे म्हणतात, "दलित अनुभवात एक फार मोठे (मेथ्यॅफिजिक्स) दडलेले आहेत. ते शोधण्याच्या यशस्वी प्रयत्नातून त्याला वैश्विकरूप निश्चितच प्राप्त होवू शकेल. अद्याप ते प्राप्त होऊ शकले नाही. दलित अनुभवात ग्रीक शोकांतिकेच्याही पलीकडे घेऊन जाणारे शोकात्म नाट्य दडलेले आहे. बदलत्या दलित जीवनातल्या ज्या समस्यांचा मी वर उल्लेख केला आहे. त्याचा वाङ्मयीन आविष्कार करण्यासाठी विविध साहित्यप्रकारांच्या फॉर्म्सचा उपयोग करावा लागेल."[२४] अशा प्रकारच्या फॉर्म्समध्ये कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा उपयोग न झाल्याने दलित साहित्यात कादंबरीचा अभाव जाणवतो, या निष्कर्षाप्रत यावे लागेल.

## समारोप -

आधुनिक कालखंडात सर्वाधिक वाचला जाणारा आणि वाचकांच्या आवडीचा असा कादंबरी हा साहित्यप्रकार आहे. वाचक आपल्या जीवनात घडलेल्या घटनांचा शोध कादंबरीत घेत असतो. आपल्या प्रकृतिधर्मानुसार कादंबरी व्याख्येत बसत नाही. काळमानानुसार कादंबरीमध्ये अनेक बदल झाले. कादंबरी ही वेगवेगळ्या घटकांनी बनलेली असते. कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोण, निवेदन, वर्णने, वातावरण, शैली इ. घटकांचा त्यात समावेश असतो. हे घटक परस्परपूरक

असतात. कादंबरीकार निवेदनशैली, पात्रात्मक शैली, पात्रमुखी शैली, रोजनिशी शैली इ. शैलींचा गरजेनुसार अवलंब करतो. कादंबरीकाराला काव्य किंवा नाटक या पेक्षा आपल्या कृतीत जास्त स्वातंत्र्य घेता येते. सर्व गोष्टी लेखकनिर्मित असल्या तरी लेखक नियंत्रित असत नाहीत. ना.सी. फडके व भालचंद्र नेमाडे ही दोन भिन्न टोके आहेत. कादंबरीला लाभणारा सामाजिक व जीवनविषयक संदर्भ महत्त्वाचा असतो. तांत्रिकदृष्टया बहिरंगाची कितीही चर्चा आणि चिकित्सा केली तरी कांदबरीचे यश तिच्या आंतरिक संसूचनांतच सामावलेले असते. नव्या नव्या लेखाकाच्या व्यक्तित्वाप्रमाणे हे आंतरसूत्र बदलणारे असते. लेखकाची कलावंत म्हणून जितकी आणि जशी समज असेल तीच त्याच्या आविष्कारातून प्रकट होते.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मराठी वाङ्मयामध्ये ठळक आणि वैशिष्ट्यपूर्ण बदल घडून आले. नवकाव्य, नवकथा, नवनाट्य इत्यादींच्या रूपाने नवसाहित्य निर्माण झाले. यातूनच पुढे ग्रामीण साहित्य, प्रादेशिक साहित्य, जानपद साहित्य, आदिवासी साहित्य इत्यादी वेगवेगळे साहित्यप्रवाह सकस आणि ताकदीने निर्माण झाले. या बदलामध्ये एक महत्त्वाचा आविष्कारही सामील होतो, तो म्हणजे 'दलित साहित्य' हा होय. सद्यस्थितीमध्ये दलित साहित्याला आणि दलित लेखकाच्या निर्मितीला एक वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप प्राप्त झाले आहे. विसाव्या शतकाच्या आरंभापासून ते उत्तरार्धापर्यंत दलितेतर लेखकांनीही, अधूनमधून दलित जीवनावर लेखन केले आहे.

दलित आणि दलितेतर विचारवंत, समीक्षक, लेखक यांच्या विचारांचा अभ्यास करताना असे आढळते की दलित साहित्याची व्याख्या बदलत गेली. दलित साहित्याच्या प्रेरणेचा मूलस्रोत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी मांडलेले विचार होत. या प्रेरणांमधून मराठी वाङ्मयामध्ये दलित साहित्य आणि विशेषत्वाने दलित कादंबरीचाही प्रवाह विकसित होत गेला.

दलित कादंबरी निर्मितीमागील आणखी एक महत्त्वाचे कारण १९६० नंतर शिक्षण, संस्कृती, सभ्यता, कला आणि वाङ्मय यांचा लाभ विस्थापितांनाही मिळू लागला. दलित समाजातून पुढे आलेला संवेदनाक्षम मनाचा माणूस साहित्याकडे आपपर भावाने पाहू लागला. सामाजिक बांधिलकीचा स्वीकार करून दलित कांदबरी आपला वेगळा ठसा, मराठी कादंबरी वाङ्मयामध्ये निर्माण करते. दलित साहित्याचा जन्मच मुळात 'साहित्यासाठी साहित्य' किवा 'कलेसाठी कला' या भावनेतून न होता सामाजिक जाणिवेच्या अपरिहार्यतेतून झाला. त्यामुळे दलित कादंबरीत समाजाच्या दुःखांना वाङ्मयीन स्वरूप प्राप्त झाले. १९६० नंतर नावारूपास आलेल्या दलित साहित्याने स्वतःचे निराळेपण व्यक्त केले आहे. दलित लेखकाला आपले जळजळीत अनुभव व्यक्त करण्यासाठी हा वाङ्मयीन फॉर्म सहज आणि सुलभ वाटण्याची शक्यता असल्यामुळे तो सूचला आहे. या माध्यमाद्वारे सामाजिक अन्याय, अत्याचाराचे अथवा सामाजिक प्रश्नांचे सर्वांगीण दिग्दर्शन आणि आकलन लोकांपुढे ठेवता येईल

हा उद्देश होता.

दलित साहित्याने मराठी साहित्याचा चेहरामोहराच बदलवून टाकला आहे. व्यवहारात जाणवणारी विषमता आणि वाङ्मयात जाणवणारी उपेक्षा या दोन्ही अनुभवांतून प्रगतीची वाट शोधत ही कादंबरी जाताना दिसते. अस्पृश्यांच्या जीवनाचे, त्यांच्यावर चालविलेल्या अन्यायाचे चित्रण करणारी मराठीतील पहिली कादंबरी म्हणजे श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची 'श्यामसुंदर' ही होय. त्यांच्या शामचा संबंध सानेगुरूजींच्या श्यामबरोबर लावला जातो. दलित वाङ्मय व्यक्तिनिर्मित असले तरी व्यक्तिनिष्ठ नसते. समष्टीच्या मनाचा आविष्कार त्यात असतो. दलित कादंबरीचे नाते मराठी कादंबरीशी कुठल्याच बाबतीत जोडता येत नाही. फक्त कथानक हा एकच फॉर्म दोन्ही कादंबरीचा आधार आहे. बाकी साम्य शोधता येणे कठीण आहे. 'दलित साहित्य' हा शब्दप्रयोग १९२० नंतरचा मानण्यात येत असला तरी त्याला दीडशे वर्षांची पूर्वपरंपरा आहे. या पूर्वपरंपरेचे बीज जोतिबा फुले यांच्या स्त्रीशिक्षणाच्या चळवळीमध्ये सापडते. आशय आणि अभिव्यक्तीच्या संदर्भातील दलित कादंबरीचे वेगळेपण, निराळेपण चटकन लक्षात राहणारे आहे. कविता, कथा, आत्मकथन, इत्यादी वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने दलित कादंबरी हा साहित्यप्रकार क्षीण वाटतो. संख्यात्मकदृष्टया विचार करता हे पटते, परंतु गुणात्मकदृष्ट्या पाहता, वेगवेगळया स्तरांतील दलितांचे जीवनचित्रण, त्यांचे विविध प्रश्न हाताळणाऱ्या आणि इतर

विषयांवरील लिखाण झालेल्या दीडशेहून अधिक कादंबऱ्या दलित लेखकांनी लिहिल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे. दलितेतर लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्या ह्या आहेतच. दलित जीवनाचे चित्रण हा हेतू ठेवून संपूर्ण कादंबरीत त्यांचे चित्रण करणाऱ्या फार थोड्याच कादंबऱ्या दिसून येतात. तर दलित जीवनाच्या अनुषंगाने चित्रित कादंबऱ्यांच्या संख्येचे प्रमाण बरेच जास्त आहे.

# संदर्भ ग्रंथ

१. 'प्रदक्षिणा' खंड - १ पृ. २०२

२. 'अनुष्टुभ' - मे/जून २००३ पृ. ०६

३. 'साहित्य-साधना' - प्रा. माधव काशिनाथ देशपांडे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती मार्च १९६१. पृ. क्र. १५३

४. 'मराठी कादंबरी पहिले शतक', कुसुमावती देशपांडे, मुंबई मराठी साहित्य संघ, गिरगाव मुंबई ०४, प्रथम आवृत्ती १९५३ पृ. १७

५. 'कादंबरी आणि मराठी कादंबरी' - उषा हस्तक - साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, पृ. क्र. २०

६. 'मराठी कादंबरी : स्त्रियांचे योगदान' - डॉ. सौ. प्रमिला भिरूड - स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद . प्रथम आवृत्ती, जून २००३, पृ. क्र. १२

७. Abrams, M.H. Awossary of litereary ferms, Edn.,3, New Yew York, Holt, Rinehart & Winston Inc. 1971. P.N. 110.

८. ed. by hilip Stevick, The free press, New York 1967, Page No. 14

९. Shaw, Harry, Dictionary of literary terms New York, Mcaraw, Hill 1982.

१०. 'दलित वाङ्मय पेरणा व प्रवृत्ती' - शंकरराव खरात, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९७६, पृ. क्र. १०१, १०२.

११. 'दलित साहित्य एक आकलन' - बाळकृष्ण कवठेकर, मेहता पब्लिशिंग

हाऊस पुणे, दुसरी आवृत्ती, जुलै १९९६, पृ. क्र. ५२.

१२. 'दलित साहित्य वेदना आणि विद्रोह' - भालचंद्र फडके, श्री विद्या प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, डिसेंबर १९७७, पृ.२६.

१३. तत्रैव. पृ. ३२

१४. 'दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृत्ती' - शंकरराव खरात, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९७६, पृ. क्र. १०१, १०४.

१५. 'साहित्य चिंतन' - डॉ. जनार्धन वाघमारे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १५ ऑगस्ट, १९९२, पृ. क्र. ८६.

१६. 'दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृत्ती' - शंकरराव खरात, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९७६, पृ. क्र. १०१, १०४.

१७. 'दलित साहित्य वेदना आणि विद्रोह' - भालचंद्र फडके, श्री विद्या प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, डिसेंबर १९७७, पृ.२१३, २१४.

१८. 'दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृत्ती' - शंकरराव खरात, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९७६, पृ. क्र. १०८.

१९. 'दलित साहित्य वेदना आणि विद्रोह' - भालचंद्र फडके, श्री विद्या प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, डिसेंबर १९७७, पृ.२१०.

२०.'दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृत्ती' - शंकरराव खरात, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,

पुणे पहिली आवृत्ती, १९७६, पृ. क्र. ११२.

२१. 'दलित साहित्य एक आकलन' - बाळकृष्ण कवठेकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दुसरी आवृत्ती, जुलै १९१६, पृ. क्र. ७७, ७८.

२२. तत्रैव. पृ. क्र. ९०

२३. तत्रैव पृ. क्र. ९२

२४. 'साहित्य चिंतन' - डॉ. जनार्धन वाघमारे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १५ ऑगस्ट, १९९२, पृ. क्र. ८६.